**:– नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६०/२०१७ मधील नि. ८६ खालील आदेश –:**

(आनंद नारायण सावंत व.५ विरुध्द रघुनाथ महादेव मोर्ये व.)

प्रतिवादी क्र. १ब यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र. १ब ने अर्जात असे कथन केले आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा हा हक्कस्थापना व ताकिदीकरीता दाखल केलेला असून, त्यातील प्रतिवादी क्र. १अ, १ब, १फ, १ग आणि १य यांनी सदरहु दाव्याचे कामी नि. ५६ येथे कैफियत देऊन दाव्यास हरकत उभारलेली आहे. सदर कैफियतीच्या परिच्छेद क्र. १० मध्ये वादींच्या तथाकथीत ३२म प्रमाणपत्राबाबत साशंकता दर्शविताना, नारायण भगवान वेंगुर्लेकर यांचेशी निगडीत मौजे पाट फेरफराचा उल्लेख केलेला आहे. तथापी सदर फेरफार नंबर टंकलिखीत करतेवेळी ५६७८ ऐवजी अनावधानाने ७६०८ असा टंकलिखीत झालेला आहे. सबब, कैफियतीच्या परिच्छेद नं. १० मधील फेरफाराचा नंबर ७६०८ या अंकाऐवजी ५६७८ अशा अंकाची दुरुस्ती करणेस परवानगी मिळाली अशी विनंती प्रतिवादीने केली आहे. सदरची दुरुस्तीमुळे दाव्याचे गुणदोषावर कोणताही परिणाम होणार नाही. त्यामुळे प्रतिवादीस वर नमुद दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

०३. वादीने सदर अर्जावरच म्हणणे देऊन सदर अर्जास हरकत घेतली आहे. सदरचा अर्ज सदभावनेने दिलेला नाही व विलंबाने दिलेला आहे. सबब अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. दावा व त्यासोबतचे कागदपत्रांचे अवलोकन केले. उभयपक्षकारांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०५.** वादीने प्रस्तुतचा दावा हा हक्कस्थापना व ताकिदीकरीता दाखल केलेला आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, प्रतिवादीचे कैफियतीमधील पान नं. ५ वर परिच्छेद नं. १० मध्ये मौजे पाट फेरफार नं. ७६०८ असे दिसून येते. वादीने प्रस्तुत अर्जात फेरफार क्र. ५६७८ आहे असे कथन केले आहे. सदर फेरफारातील प्रस्तावित दुरुस्ती ही तांत्रिक तसेच टंकलेखनाच्या चुकीमुळे झाली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. प्रस्तुत दाव्याचे कामी वादमुद्दे निश्चीत झालेले आहेत. प्रस्तुत कामातील रोजनामा पाहता, सदरचा दावा हा वादीने पुढील पुरावा देणेवर दिसून येतो. सदरील फेरफारानुसार नारायण भगवान वेंगुर्लेकर यांचेशी निगडीत असणा–या मौजे पाट फेरफारचा योग्य नंबर कैफियतीमध्ये नमूद होणेकरीता प्रतिवादी प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने दुरुस्ती करुन अभिलेखावर आणू पाहत आहे. नि. ८९ सोबत दाखल केलेल्या फेरफार क्र. ५६७८ चे अवलोकन केले असता त्यावर नारायण भगवान वेंगुर्लेकर यांचे नावाचा उल्लेख आढळून येतो. कैफियतीत कोणत्याही प्रकारची न्यूनता राहू नये म्हणुन कैफियत दुरुस्ती करणे गरजेचे आहे असे दिसून येते. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असणारा खरा वाद अंतिमरित्या न्यायनिर्णित करण्यास न्यायालयास मदतच होणार आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे कैफियतीचे स्वरुपात कोणताही बदल होणार नाही, तसेच वादीचे कोणत्याही स्वरुपाचे नुकसान होणारे नाही. त्यामुळे सदरील दुरुस्ती करण्यास प्रतिवादीस परवानगी देणे योग्य आहे असे मला वाटते. त्यामुळे, उपरोक्त विवेचनानुसार मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**–: <u>आदेश</u> :–**

१. नि. ८६ कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ब यांना अर्जातील मागणीप्रमाणे कैफियतीमध्ये दुरुस्त करण्याची परवानगी देण्यात येते.

३. सदरची दुरुस्ती आदेशाच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत किंवा तत्पुर्वी करुन दुरुस्त कैफियतीची प्रत दाखल करावयाची आहे.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2024.08.07 17:59:33 +0530

दिनांक– ०७/०८/२०२४ (प.रा.ढोरे)
सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,कुडाळ.